Dhd 2
2017-18

ISSN 2229-4406

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education for all Subjects

UNIVERSAL RESEARCH ANALYSIS

(Refereed & Peer Reviewed Research Journal)

Year - VII, Issue-XIV, Vol.-III | Impact Factor 3.18 (GRIFI) | Mar. 2017 To Aug. 2017



EDITOR IN CHIEF

Dr. BALAJI KAMBLE

IMPACT FACTOR
3.18

ISSN 2229-4406

International Registered & Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

UNIVERSAL RESEARCH ANALYSIS

URA

REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Issue - XIV, Vol. III
Year - VII (Half Yearly)
Mar. 2017 To Aug. 2017

Editorial Office :
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

Contact : 02382 -241913
9423346913 / 9503814000
9637935252 / 7276301000

Website
www.irasg.com

E-mail :
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com

Publisher :
Jyotichandra Publication
Latur, Dist. Latur - 413531. (MS)

Price : ₹ 200/-

CHIEF EDITOR

Dr. Balaji G. Kamble
Research Guide & Head,
Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar College,
Latur, Dist. Latur. (M.S.)India.

EXECUTIVE EDITORS

Dr. Suhas Avhad
Chairman, BOS in Economics,
S. P. Pune University
Pune, Dist. Pune (M.S.)

Dr. D. Raja Reddy
Chairman, International Neuro Surjery Association,
Banjara Hill, Hayderabad (A.P.)

Dr. E. Siva Nagi Reddy
Director, National Institue of Hospitality & Tourism Management,
Hyderabad (A.P.)

Dr. A. H. Jamadar
Chairman, BOS Hindi,SRTMUN & Head, Dept. of Hindi, BKD College,Chakur, Dist. Latur (M.S.)

Dr. Yu Takamine
Professor, Fafulty of Law & Letters,
University of Ryukyas,
Okinawa, (Japan).

Dr. Shaikh Moinoddin G.
Dept. of Commerce,
Lal Bahadur Shastri College,
Dharmabad, Dist. Nanded(M. S.)

Dr. Sadanand H. Gone
Principal, Ujwal Gramin Mahavidyalaya, Ghonsi,
Dist. Latur. (M.S.)

Scott A. Venezia
Director, School of Business,
Ensenada Campus,
California, (U.S.A.)

DEPUTY-EDITOR

Dr. Balaji S. Bhure
Head, Dept. of Hindi,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

Dr. Babasaheb M. Gore
Principal,
Smt. S.D.D.M.College
Latur, Dist. Latur (M.S.)

CO-EDITORS

Dr. V.J. Vilegave
Head, Dept. of P.A.,
Shri. Guru Buddhiswami College,
Purna, Dist. Parbhani (M.S.)

Dr. Omshiva V. Ligade
Head, Dept. of History
Shivjagruti College, Nalegaon,
Dist. Latur. (M.S.)

Dr. S.B. Wadekar
Dept. of Dairy Science,
Adarsh College,
Hingoli, Dist. Hingoli.(M.S.)

Dr. Shivanand M. Giri
Dept. of Marathi,
Bhai Kishanrao Deshmukh College,
Chakur Dist. Latur.(M.S.)

Issue : XIV, Vol. II
UNIVERSAL RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 3.18
ISSN 2229-4406
Mar. 2017 To Aug. 2017

INDEX

Sr. No.	Title of Research Paper	Author(s)	Page No.
1	Indian Economy Turnes The Corner	Dr. Baljeet K.Oberoi	1
2	Indian Financial Sector Commercial Banks	Dr. Rita T. Deshmukh	6
3	Insurance Sector: Challenges & Opportunities In India	Dileep D. Shahade	10
4	Development in Mathematics and Astronomy in Ancient India	Dr. Pradip P. Yeole	18
5	Yoga for Sports Performance	Anjali Barde	24
6	यशपाल के साहित्य में नारी शोषण	डॉ. संतोषकुमार गुंडाप्पा गाजले	31
7	जागतिकीकरण आणि भारतातील महिला सक्षमीकरण	डॉ. बालाजी ग्या. कांबळे	36
8	महाराष्ट्रातील वनांचे प्रकार : एक अभ्यास	डॉ. संतोष तु. कुटे, गजानन संतोषराव कुबडे	40
9	जाती अंताच्या लढाईतील फुले, शाहू, आंबेडकरांचे योगदान	श्री. श्रीराम शरदचंद्र साळुंके	46
10	संत तुकारामांचा पारंपारिक मानवतेच्या संकल्पनेचा नकार आणि बंडखोरीचा आवाज	माधुरी व्ही. भटकर	53
11	उदारमतवाद आणि नक्षलवाद - एक राजकीय विश्लेषण	डॉ. व्ही. एच. भटकर	59

Issue : XIV, Vol . III
URA UNIVERSAL RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 3.18
ISSN 2229-4406
Mar. 2017 To Aug. 2017

8

महाराष्ट्रातील वनांचे प्रकार : एक अभ्यास

डॉ. संतोष तु. कुटे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
कला व विज्ञान महिला महाविद्यालय,
मेहकर, जि. बुलडाणा (महाराष्ट्र) भारत

गजानन संतोषराव कुबडे
अर्थशास्त्र विभाग,
मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय,
वाशिम, जि. वाशिम (महाराष्ट्र) भारत

Research Paper - Economics

प्रस्तावना :

जंगले ही देशाची फार मोठी नैसर्गिक साधन संपत्ती आहे. जंगलाचे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष असे अनेक फायदे आहेत. वनस्पती कार्बनडाय ऑक्साईड सेवन करतात व प्राणवायू सोडतात. त्यामुळे मुनष्य प्राण्याला श्वसनासाठी प्राणवायू सहज मिळू शकतो. अन्यथा मनुष्य प्राण्याला प्राणवायू मिळणे कठीण झाले असते. जंगल संपत्तीचे अनेक फायदे आहेत. भारतीय जंगलातून इमारती, जळाऊ व व्यापारी स्वरुपाचे जवळपास ४००० प्रकारचे लाकूड मिळते. लाकूड घर बांधणी, फर्निचर, शेतीचे अवजारे जहाज बांधणी रेल्वे इ. साठी उपयोगी पडते. मानवाला ऑक्सीजन आणि जीवनायोगी वस्तूंचा पुरवठा करणाज्या या वनांचे महाराष्ट्रातील प्रकार अभ्यास सदर शोधनिबंधातून केला आहे.

शोधनिबंधाचा उद्दिष्टये:

१. महाराष्ट्रातील वनक्षेत्राचा अर्थ अभ्यासणे.

२. महाराष्ट्रात आढळणाज्या वनांचे वर्गीकरण अभ्यासणे.

३. महाराष्ट्रातील जिल्हानिहाय वनआच्छादनाचा आढावा घेणे.

अभ्यास पध्दती:

सदर शोधनिबंधासाठी दुय्यम तथ्य सामग्रीचा आधार घेण्यात आला आहे. व त्या आधारे महाराष्ट्रातील वनांचे प्रकार आणि वनक्षेत्राचे वर्गीकरण अभ्यासले आहे.

वनक्षेत्राचा अर्थ:

महाराष्ट्रात आढळणाऱ्या वनांचे वर्गीकरण ढोबळमानाने चार भागात करण्यात येते. अशा जमीनी जेथे वनस्पतीकीय घनत्त्व हे ७० टक्के किंवा पेक्षा अधिक असते त्या प्रदेशातील वने ही अतिघनदाट आहेत असे म्हटले जाते. अशा जमीनी जेथे वनस्पतीकीय घनत्त्व ४० टक्के पेक्षा अधिक आणि ७० टक्के पेक्षा कमी आहे, त्या वनक्षेत्राला सर्वसाधारण घनदाट वनक्षेत्र असे म्हणतात.

अशा जमीनी जेथे वनस्पतीकीय घनत्त्व १० टक्के पेक्षा अधिक व ४० टक्के पेक्षा कमी आहे त्या प्रदेशाला विरळ वनाचा प्रदेश असे म्हणतात. अशा जमीनी जेथे वनस्पतीकीय घनत्त्व १० टक्के पेक्षा कमी आहे त्याला झुडपी वनाचा परिसर असे म्हणतात. अशा जमीनी ज्या वरील वर्गीकरणाच्या मापदंडात येत नाही त्यांना वनेत्तर प्रदेश असे म्हणतात.१ हेक्टर पेक्षा कमी विस्तार असलेले वृक्षाचे पट्टे किंवा तुकडे साधारणपणे ग्रामीण काष्ट समुह, घरगुती वृक्ष समूह, नागरी क्षेत्र, दाट झाडाचा समूह, रेल्वे रुळालगतचे वृक्ष, कालव्याच्या बाजूला असेलेले वृक्ष असणाज्या प्रदेशाला वृच्छादित प्रदेश म्हणतात. असे वृक्ष पट्टे आच्छादित घनेतेने कमी असले तरी आर्थिक-सामाजिक, पर्यावरणीय दृष्ट्या महत्त्वाची भूमिका पार पाडतात. High Resolution सुदूर संवदेनेच्या सहाय्याने त्यांचा वृक्ष आच्छादन म्हणून सहभाग अभिग्रहित केलेले आहे.

तक्ता क्र.१

महाराष्ट्रातील ग्रीन वॉश अंतर्गत आणि ग्रीन वॉश बाहेरील वन आच्छादन

वनाचे प्रकार	क्षेत्र (चौकिमी)
अ) ग्रीन वॉश अंतर्गत वन आच्छादन	
अती घनदाट वन	८३६१ (२२.३३)
सर्वसाधारण घनदाट वन	१५९३९ (४२.५७)
विरळ वन	१३१४३ (३५.१०)
एकूण	**३७४४३ (१००%)**
ब) ग्रीन वॉश बाहेरील वन आच्छादन	
अती घनदाट वन	३५१ (२.६६)
सामान्य घनदाट वन	४८०८ (३६.४७)
विरळ वन	८०२६ (६०.६७)
एकूण	**१३१८५ (१००%)**
एकूण (अ+ब) वन आच्छादन	**५०६२८**
वृक्ष आच्छादन	९५५८
एकूण वन व वृक्ष आच्छादन	६०१८६
प्रती व्यक्ती वन व वृक्ष आच्छादन	०.०५४ हे.
राज्याच्या भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी	१९.४३ %
भारताच्या वन व वृक्ष आच्छादनाशी टक्केवारी	७.५७ %

स्त्रोत : महाराष्ट्र शासन, वन विभाग अहवाल, पृष्ठ क्र. ८ ते १०

उपरोक्त तक्यात महाराष्ट्रातील वनाच्या प्रकारानुसार ग्रीन वॉश अंतर्गत आणि बाहेरील आच्छादित वनाच्या प्रकाराचे अध्ययन केले आहे. यावरुन असे दिसून येते की, महाराष्ट्रात ग्रीन वॉश अंतर्गत वन आच्छादनाचे क्षेत्र ३७४४३ चौ.कि.मी. असून यापैकी सर्वसाधारण घनदाट वन क्षेत्राचे प्रमाण ४२.५७ टक्के, तर विरळ वनाचे प्रमाण हे ३५.१० टक्के असलेले दिसून येते. वन आच्छादित क्षेत्रात अती घनदाट वनाचे प्रमाण २२.३३ टक्के असलेले दिसून येते.

महाराष्ट्रात ग्रीन वॉश बाहेबरील वन आच्छादनाचे क्षेत्र १३१८५ चौ.कि.मी. असून यापैकी विरळ वन क्षेत्राचे प्रमाण ६०.६७ टक्के, सामान्य घनदाट वनाचे प्रमाण हे ३६.४७ टक्के असलेले दिसून येते. तर वन आच्छादित क्षेत्रात अती घनदाट वनाचे प्रमाण केवळ २.६६ टक्के असलेले दिसून येते. एंकदरीत महाराष्ट्रात ग्रीन वॉश अंतर्गत असलेल्या वन आच्छादनाचे प्रमाण ७३.९६ टक्के तर ग्रीन वॉश बाहेरील वन आच्छादनाचे प्रमाण २६.०४ टक्के असलेले दिसून आले. भारतातील एकूण वन आच्छादनाच्या ७.५७ टक्के वन आच्छादन हे महाराष्ट्रात असलेले दिसून येते.

महाराष्ट्रातील वनाचे प्रकार

महाराष्ट्रात विविध प्रकारची वने आढळून येत असून त्यांचे प्रकार, एकूण क्षेत्र आणि प्रतिशत प्रमाण अभ्यासणारा तक्ता पुढीलप्रमाणे

तक्ता क्र.२

महाराष्ट्रातील वनाचे प्रकार (क्षेत्र चौ. कि.मी.)

अ.क्र.	वनाचे प्रकार	क्षेत्र	टक्केवारी
१	पश्चिम किनारपट्टी निमसदाहरीत वने	३९४८.१७	७.६३
२	मध्यम दमट बांबू झाडी	४९.२	०.०९
३	दमट सागवने	७०८८.८६	१३.७१
४	दक्षिणीय मिश्र पानगळीतची वने	८३४७.८८	१६.१४
५	खारफुटी झुडूप	२३.४२	०.०५
६	खारफुटी वने	१९.१६	०.०४
७	शुष्क पानगळीची वने	९७५०.६२	१८.८५
८	दक्षिणीय शुष्कि मिश्र पानगळीची वने	१५३७५.८४	२९.७३
९	शुष्क् पानगळीय झुडपी वन	४२३७.५२	८.१९
१०	बोसेवेलीया वन	८०.६९	०.१६
११	बाभुळ वन	९.७९	०.०१
१२	हार्डविकीया वन	५७.४४	०.११
१३	ब्युटिया वन	४.०३	०.०१
१४	शुष्क बांबू झुडूप	१७८.१९	०.३४
१५	दक्षिणीय काटेरी वन	५२५.९२	१.०२
१६	पश्चिमीय अर्ध उष्णकटिबंधीय डोंगरीवने	७९५.१०	१.५४
१७	वृक्षारोपन/ बाह्य वन वृक्ष	१२३२.१७	२.३८
	एकूण	**५१७२४.००**	**१००%**

स्त्रोत : ॲटलस फारेस्ट टाईम्स ऑफ इंडिया.

उपरोक्त तक्त्यात महाराष्ट्रातील वनाचे प्रकार आणि या वनांचे क्षेत्र अभ्यासले आहे. यावरुन स्पष्ट होते की, राज्यात विविध प्रकारच्या जवळपास १७ जातीचे वने आढळून येतात. यामध्ये प्रामुख्याने दक्षिणीय शुष्की मिश्र पानगळीची वनांचे प्रमाण सर्वाधिक २७.७३ टक्के असून, त्यानंतर अनुक्रमे शुष्क पानगळीची वने १८.८५ टक्के, दक्षिणीय मिश्र पानगळीतची वने १६.१४ टक्के, दमट सागवने १३.७१ टक्के, शुष्क् पानगळीय झुडपी वनांचे प्रमाण हे ८.१९ टक्के, पश्चिम किनारपट्टी निमसदाहरीत वनांचे प्रमाण ७.६३ टक्के असलेल आढळून आले. तसेच इतर वनांचे प्रमाण हे अतिशय कमी असलेले आढळून आले.

थोडक्यात, महाराष्ट्रातील वनांमध्ये पानगळीय वृक्षांचे प्रमाण जास्त असलेले दिसून येते. याशिवाय झुडपी वने सद्धा पहायला मिळतात.

महाराष्ट्रातील जिल्हानिहाय वन आच्छादन:

महाराष्ट्रात ३५ जिल्ह्यांचा समावेश असून जिल्ह्यातील वनांची स्थिती लक्षात घेण्यासाठी राज्यात समाविष्ट जिल्ह्यात वन आच्छादनाचे प्रमाण तसेच एकूण भौगोलिक क्षेत्राशी वन आच्छादित क्षेत्राचे प्रमाण अभ्यासले आहे ते पुढीलप्रमाणे सांगता येते.

तक्ता क्र.३

महाराष्ट्रातील जिल्हानिहाय वन आच्छादन

जिल्हा	भौगोलिक क्षेत्र	अतिघनदाट वन	सर्व साधारण घनदाट वन	विरळ वन	झुडपी वने	एकूण	भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी
अहमदनगर	१७०४८	०	६९	२१४	५५५	८३८	४.९२
अकोला	५३९०	११	९६	२१५	८	३३०	६.१२
अमरावती	१२२१०	६५५	१४५५	१०७७	११६	३३०३	२७.०५
औरंगाबाद	१०१०७	१९	१०१	४३७	१९३	७५०	७.४२
भंडारा	३५८८	१२९	१५३६	२१९	२१	१९०५	५३.०९
बीड	१०६९३	०	१३	१६२	३५७	५३२	४.९८
बुलडाणा	९६६१	२३	१३७	४३०	१६३	७५३	७.७९
चंद्रपूर	११४४३	१३२७	१५७९	११६७	५६	४१२९	३६.०८
धुळे	७१८९	०	७०	२४६	१०३	४१९	५.८३
गडचिरोली	१४४१२	४७३०	३३७९	१९८८	२०	१०११७	७०.२०
गोंदिया	५७३३	८८०	८१६	३१२	३७	२०४५	३५.६७
हिंगोली	४६८६	०	१०	१०४	४७	१६१	३.४४
जळगाव	११७६५	५१	३५९	७७३	६९	१२५२	१०.६४
जालना	७७१८	१	१६	४८	५५	१२०	१.५५
कोल्हापूर	७६८५	६५	१०३८	६७९	८८	१८७०	२४.३३
लातूर	७१५९	०	०	५	२५	३०	०.४२
मुंबई शहर	१५७	०	०	२	०	२	१.२७
मुंबई उपनगर	४४६	०	६२	५९	०	१२१	२७.१३
नागपूर	९८९२	००	९४६	६९५	७७	१७१८	१७.३७
नांदेड	१०५२८	६०	४३४	४२०	१२८	१०४२	९.९०
नंदूरबार	५९६१	०	४०६	७९७	३०	१२३३	२०.६८
नाशिक	१५५३०	०	३५१	७३८	३१९	१४०८	९.०७
उस्मानाबाद	७५६९	०	३	४०	४९	९२	१.२२
परभणी	६३५५	०	४	४६	४९	९९	१.५६
पुणे	१५६४३	०	७५७	९७७	४९३	२२२७	१४.२४
रायगड	७१५२	१३	१२४७	१६१५	७०	२९४५	४१.१८
रत्नागिरी	८२०८	३३	१९०९	२२५४	२	४१९८	५१.१५
सांगली	८५७२	०	९५	५०	१५६	३०१	३.५१
सातारा	१०४८०	११९	५६९	५८८	३६५	१६४१	१५.६६
सोलापूर	१४८९५	०	८	४०	५०	९८	०.६६
सिंधुदूर्ग	५२०७	८८	१३५९	११३०	४७	२६२४	५०.३९
ठाणे	९५५८	०	१२८१	१६२७	२२२	३१३०	३२.७५
वर्धा	६३०९	१०	४१९	४३०	६२	९२१	१४.६०
वाशिम	५१८४	५	११३	२१४	२८	३६०	६.९४
यवतमाळ	१३५८२	१२३	१११०	१३७१	९७	२७०१	१९.८९
एकूण	**३०७७१५**	**८३४२ (१५.०५)**	**२१७४७ (३९.२४)**	**२११६९ (३८.२०)**	**४१५७ (७.५०)**	**५५४१५ (१००%)**	**१८.०१**

स्त्रोत : वन विभाग, महाराष्ट्र शासन, www.mahaforest.gov.in

उपरोक्त तक्त्यात महाराष्ट्र राज्यात समाविष्ट जिल्ह्यातील वनाच्या प्रकारानुसार क्षेत्राचे अध्ययन केले आहे. यावरुन स्पष्ट होते की, महाराष्ट्रातील जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ ३०७७१५ चौ.कि.मी. असून यापैकी विविध प्रकारच्या वनांचे क्षेत्रफळ हे ५५४१५ चौ.कि.मी. असून एकूण भौगोलिक क्षेत्राचे वनाचे प्रमाण १८.०१ टक्के असलेले दिसून येते. एकूण वनाच्या क्षेत्रापैकी अती घनदाट वनाचे क्षेत्र १५.०५ टक्के, सर्वसाधारण घनदाट वनांचे प्रमाण सर्वाधिक ३९.२४ टक्के, विरळ वनांचे प्रमाण ३८.२० टक्के तर झुडपी वनांचे प्रमाण ७.५० टक्के असलेले दिसून आले. थोडक्यात, महाराष्ट्रातील एकूण वनक्षेत्रात सर्वसाधारण घनदाट आणि विरळ वनांचे प्रमाण सर्वाधिक असलेले दिसून आले.

महाराष्ट्रातील सर्वाधिक वनाचे क्षेत्र असणारा जिल्हा गडचिरोली असून येथील वनांचे प्रमाण एकूण वनक्षेत्राशी १८.२६ टक्के असलेले दिसून आले. तर सर्वात कमी वनांचे प्रमाण ०.००३ टक्के हे मुंबई शहरात असलेले दिसून आले.

महाराष्ट्रातील एकूण भौगोलिक क्षेत्राशी वनक्षेत्राशी सर्वाधिक प्रमाण असणारे प्रमुख पाच जिल्हे विचारात घेता यामध्ये प्रामुख्याने गडचिरोली या जिल्ह्यातील भौगोलिक क्षेत्राशी एकूण वनक्षेत्राचे प्रमाण ७०.२० टक्के, भंडारा जिल्ह्यात ५३.०९ टक्के, रत्नागिरी जिल्ह्यात ५१.१५ टक्के, सिंधुदूर्ग जिल्ह्यात ५०.३९ टक्के, रायगड जिल्ह्यात ४१.१८ टक्के असलेले दिसून आले. तर एकूण भौगोलिक क्षेत्राशी वनक्षेत्राशी सर्वात कमी प्रमाण असणारे प्रमुख पाच जिल्हे विचारात घेता यामध्ये प्रामुख्याने लातूर या जिल्ह्यातील भौगोलिक क्षेत्राशी एकूण वनक्षेत्राचे प्रमाण ०.४२ टक्के, सोलापूर जिल्ह्यात ०.६६ टक्के, उस्मानाबाद जिल्ह्यात १.२२ टक्के, मुंबई शहरात १.२७ टक्के, जालना जिल्ह्यात १.५५ टक्के असलेले दिसून आले. थोडक्यात, महाराष्ट्रात विविध प्रकारची वने आणि वनाच्छदीत प्रदेशाचे अस्तित्त्व असलेले दिसून येते. असे असले तरी जिल्हानिहाय वनाच्छदीत वर्गीकरणात विषमता असलेली दिसून येते.

संदर्भ सूची :-

१. दास्ताने संतोष., (२००७)., महाराष्ट्र -२००६., दास्ताने आणि कंपनी, पुणे.
२. घारे मुकुंद (२०१०) -नैसर्गिक संसाधनाची परिस्थितीकी, प्रफुल्लता प्रकाशन, पुणे.
३. वराट तुकाराम, गवळी नारायण (२००७), पर्यावरण शिक्षण आणि आपत्ती व्यवस्थापन, अर्थव प्रकाशन, पुणे.
४. चौहान धमेंद्रसिंह (२०१२), भारत का भूगोल, रितू पब्लिकेशन्स, जयपूर.
५. www.mahaforest.nic.in
६. www.mahadesmaharashtra.gov.in
७. www.maharashtra.gov.in